जा. क्र. माध्य-३/प्रथम मान्यता/पुणे/१९९

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,

पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक:- 29 AUG 1994

प्रति,

शिक्षणाधिकारी [माध्यमिक],

जिल्हा परिषद---पुणे------.

विषय:- प्रथम मान्यता

**श्री. गुरुदत्त शिक्षण संस्था संचलित लो. टिळक विद्या. कडेठाण**

संदर्भ :- आपले पत्र जा. क्र. **शिक्षण/माध्य/ह-४ ९३-९४ दि. १५/४/९४.**

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३. १, ३. २, ३. ३. अन्वये---**श्री. गुरुदत्त शिक्षण संस्था, कडेठाण ता. दौंड**---संस्थेच्या **मराठी** माध्यमिक शाळेच्या इ. ८वी/९वी/१०वी च्या वर्गास सन १९ **९३-९४** या शैक्षणिक वर्षासाठी जून १९ **९३** पासून मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्य] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करून पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केल्या आहेत किंवा कसे याचाही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने मालकीची शैक्षणिक दृष्टया योग्य व पुरेशी **स्वतंत्र** इमारत उपलब्ध करून द्यावी.

२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.

३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करून द्यावी.

४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.

५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यावे.

६] पुरेसा प्रशिक्षित वर्ग उपलब्ध करून द्यावा.

७] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करून द्यावी.

८] वाढीव फीचे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजुर करूनघ्यावेत.

९] शालेय रेकॉर्ड माध्य. शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.

१०] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.

११] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.

१२] विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करावी.

१३]

१४]

[illegible]

प्रत-मुख्याध्यापक,
लोकमान्य टिळक प्रविद्या. कडेठाण ता. दौंड

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

"यशवंतराव चव्हाण भवन"
पुणे जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (माध्य) ६५२
जा. क्र./शिक्षण/माध्य/ह.४.../नावबदल/९६.
पुणे-१. दिनांक १२/२/९७.

प्रति,
सचिव,
श्री गुरुदत्त शिक्षण मंडळ, केडगाव.
ता. दौंड, जि. पुणे.

विषय - शाळेच्या नावात बदल करणेस परवानगी देणेबाबत.

संदर्भ - मा. शिक्षण उपसंचा. पुणे विभाग, यांचेकडील पत्र क्र. माध्य ३/१२/ना.ब/९७/११०६, दि. २०/१/९७.

उपरोक्त विषयसंदर्भान्वये आपणास कळविणेत येते की, आपल्या संस्थेद्वारा संचलित लोकमान्य टिळक विद्यालय, केडगाव, ता. दौंड या विद्यालयाच्या नावात "के. त्रिंबक दिवेकर विद्यालय" केडगाव, ता. दौंड असा बदल करणेस परवानगी देणेत येत आहे.

शिक्षणाधिकारी (माध्य.)
पुणे जिल्हा परिषद, पुणे करिता